**कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग**

मुं.मे.रे.कॉ. द्वारे जागतिक भुयारिकरण दिवस साजरा

मुंबई, ३ डिसेंबर, २०२१ – जागतिक भुयारिकरण दिवस हा ४ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस दरवर्षी स्मरणार्थ सेंट बार्बराचा उत्सव दिवस म्हणून साजरा होतो, भुयारीकरणाचे संत म्हणून ते ओळखले जाते.

यावर्षी यंग ग्रुप ऑफ इंटरनॅशनल टनेलिंग अँड अंडरग्राउंड स्पेस असोसिएशन (ITAYM) द्वारे भारतासह २८ राष्ट्रीय तरुण सदस्य गटांसोबत ३ डिसेंबर २०२१ रोजी २४ तासांच्या ऑनलाइन बैठकीमध्ये जागतिक भुयारिकरण दिवस साजरा करण्यात आला.

जगभरात राबविल्या जात असलेल्या भुयारीकरणाच्या प्रकल्पांमध्ये स्वारस्य निर्माण करणे आणि सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्यांना याविषयी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने हा दिवस साजरा केला जातो. टनेलिंग असोसिएशन ऑफ इंडिया (TAI) ने देखील हा दिवस नवी दिल्लीतील TAI कार्यालयात जमलेल्या तरुण टनेलर्स एकत्र येण्यासाठी साजरा केला. याप्रसंगी श्री.एस.के.गुप्ता, संचालक – प्रकल्प, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे "अंडरग्राउंड स्पेसचा उपयोग - आजच्या काळाची गरज" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

“ITAYMच्या तरुण आणि उत्साही प्रेक्षकांना संबोधित करताना खूप आनंद झाला. मुंबईसारख्या दाट लोकसंख्येच्या शहरामध्ये भुयारीकरणाच्या आव्हानांवर चर्चा करण्यात आली. तसेच नदी , ऐतिहासिक व उंच इमारती, फ्लायओव्हर्स, सध्याची मेट्रो लाईन आणि रेल्वे लाईन खालून मुंबईतील पहिल्या भूमिगत मेट्रो साठी भुयारीकरण करण्यात आले आहे.” श्री. एस.के. गुप्ता, संचालक - प्रकल्प, मुं.मे.रे.कॉ म्हणाले.(समाप्त)

For further information please contact: -

| | |
|---|---|
| Vaidehi More | Niti Tamse |
| 9028543087 | 8369727364/9664215544 |
| vaidehi.more@mmrcl.com | niti.tamse@mmrcl.com |